# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
☎ २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/गुणवत्तयादी २०१८-१९/२०१९/२१२५ दिनांक : १०/०१/२०१९

प्रति
प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व विना अनुदानीत
पदवी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय – शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्या पडताळणीबाबत.

संदर्भ – तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/प्रवेश यादी पडताळणी/२०१८/१२५० दिनांक २५/०९/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्यांची पडताळणी या कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. तसेच प्रवेश नियमाक प्राधिकरण यांनी नियुक्त केलेल्या अधिका-यांनी देखील आपल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची सर्व कागदपत्रे तपासलेली आहेत व अढळलेल्या त्रुटींचा अहवाल आपणास त्यांनी दिलेला आहे.

**प्रवेश नियमाक प्राधिकरणानी नियुक्त केलेल्या अधिका-यांना ज्या संस्थांमध्ये त्रुटी आढलेल्या आहेत अशा सर्व संस्थांनी त्रुटी अहवालासह व त्रुटीपुर्ततेच्या कागदपत्रासह या कार्यालयात या कार्यालयाने तपासणी करुन दिलेल्या गुणवत्तायाद्यीच्या प्रती सह खाली दर्शविलेल्या दिनांकास उपस्थित रहावे. खालील दिलेल्या दिनांकास उपस्थित न राहील्यास आपल्या संस्थेच्या त्रुटी पुर्तता करण्यात येणार नाही याची संबधीत संस्थांनी नोंद घ्यावी.**

तपासणी करीता येताना महाडीबीटी वेबपोर्टलवरील संस्थेच्या लॉगईन (क्लार्क व प्रिन्सीपल लागईन) मध्ये प्रलंबित डॉ पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना, राजर्षी छत्रपती शाहूमहाराज अर्थिक मागास शिष्यवृत्ती योजना व अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज **निरंक** असतील याची खबरदारी घ्यावी तसेच विद्यार्थ्यान परत पाठविलेले अर्ज देखील परत आपल्याकडे येवून ते देखील शुन्य असतील याची खबरदारी संस्थांनी घ्यावी. सदर अर्ज जर प्रलंबीत असतील तर संस्थेच्या गुणवत्तायाद्यांची त्रुटी पुर्तता करण्यात येणार नाही याची देखील संस्थांनी नोंदघ्यावी.

| अ क्र | जिल्हा | अभ्यासक्रम | उपस्थित रहण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुणे | पदवी व पदव्युत्तर पदवीअभियांत्रिकी | १४/०१/२०१९ ते १५/१/२०१९ |
| | | पदवी व पदव्युत्तर औषनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र/एचएमसीटी | १६/०१/२०१९ |
| २ | सातारा / सोलापूर जिल्हा | सर्व संस्था | १७/०१/२०१९ |
| ३ | कोल्हापूर/सांगली जिल्हा | सर्व संस्था | १८/०१/२०१९ |
| ४ | पुणे जिल्हा | पदव्युत्तर पदवी व्यवस्थापन शास्त्र एम बी ए | १९/०१/२०१९ |
| ५ | पुणे सोडून उर्वरीत जिल्हे | पदव्युत्तर पदवी व्यवस्थापन शास्त्र एम बी ए | २१/०१/२०१९ |
| ६ | सर्व जिल्हे | एम सी ए अभ्यासक्रमाच्या संस्था | २१/०१/२०१९ |

10/1/19

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.